263 290 - ३३४ -

६३

महाराष्ट्र प्रादेशिक व नगर रचना अधिनियम, १९६६

---

महाराष्ट्र प्रादेशिक व नगर रचना [ प्रादेशिक नियोजन मंडळे ] नियम, १९६७ मध्ये बदल करण्याबाबत अधिसूचना.

महाराष्ट्र शासन,
नगर विकास विभाग,
शासन निर्णय क्रमांक: टीपीबी ४३८९/४३२३ / नवि- ११,
मंत्रालय, मुंबई ४०००३२, दिनांक: ६ सप्टेंबर १९९१.

पहा:- १] दिनांक १४ मार्च, १९९१ रोजीच्या महाराष्ट्र शासन राजपत्र भाग-४ ब मध्ये प्रसिध्द झालेली अधिसूचना क्र. टीपीबी ४३९०/४३२३/नवि-११. दिनांक २ मार्च, १९९१.

निर्णय :- सोबत जोडलेली अधिसूचना महाराष्ट्र शासनाचे असाधारण राजपत्रात प्रसिध्द करण्यांत यावी.

[ ना. शां. कुळकर्णी. ]
महाराष्ट्र शासनाचे अवर सचिव,

प्रति,

अ धि सू च ना

नगर विकास विभाग मंत्रालय मुंबई ४०००३२
दिनांक ६ सप्टेंबर ~~ऑगस्ट~~ १९९१.

| महाराष्ट्र प्रादेशिक व नगर रचना अधिनियम १९६६ |

क्रमांक टीपीबो ४३८८/४३२३/नवि. ११

ज्याअर्थी दिनांक १४ मार्च, १९९१ रोजीच्या महाराष्ट्र शासन राजपत्र भाग-४ब मध्ये प्रसिध्द झालेल्या नगर विकास विभागाच्या शासकिय अधिसूचना क्र. टीपीबी/४३८८/४३२३/युडी. ११, दिनांक २ मार्च १९९१ ~~अन्वये~~ व्दारे महाराष्ट्र शासनाने महाराष्ट्र प्रादेशिक व नगर रचना अधिनियम १९६६ [यापुढे "उक्त अधिनियम"असा उल्लेख केला आहे]चे कलम १५८ चे उपकलम[१] व उपकलम [२]चे खंड क्र. [एक]ते [नऊ]खालील प्रदक्त शक्तींचा वापर करुन महाराष्ट्र प्रादेशिक व नगर रचना [प्रादेशिक नियोजन मंडळ]नियम १९६७ [यापुढे "उक्त नियम" असा उल्लेख केला आहे]ह्यातील नियम क्र. ७मध्ये फेरबदल सुचविले होते.

त्याअर्थी उक्त अधिनियमाच्या कलम १५८ चे उपकलम [१]अन्वये महाराष्ट्र शासन, याव्दारे उक्त नियमातील नियम क्र. ७ मधील तरतुदी ऐवजी खालील तरतुदीचा समावेश करीत आहे.

"कलम १५ अन्वये तरतुद केल्याप्रमाणे राज्य शासनाला ज्या मुदतीत प्रादेशिक योजनेला मान्यता देता येईल किंवा ती नाकारता येईल ती मुदत राज्य शासनाला उक्त योजना मिळण्याच्या तारखेपासून साठ महिन्यांची असेल.

परंतु राज्य शासनास लेखी नमूद करावयाच्या पुरेशाकारणावरुन ही मुदत एकावेळी २४ महिन्यापेक्षा अधिक असणार नाही परंतु कोणत्याही प्रकरणी एकूण साठ महिन्यापेक्षा अधिक होणार नाही इतक्या मुदतीपर्यंत वाढविता येईल".

महाराष्ट्र शासनाचे राज्यपाल यांचे नांवाने व आदेशानुसार

[ ना. शं. कुळकर्णी ]
महाराष्ट्र शासनाचे अवर सचिव